प्रसिद्धी पत्रक
PRESS NOTE
CITY & INDUSTRIAL DEVELOPMENT CORPORATION OF MAHARASHTRA LTD.
Regd. Office: Nirmal, 2nd Floor, Nariman Point, Mumbai 400 021. Tel.: 91-22-6650 0900; FAX:91-22-6650 0933; www.cidcoindia.com
Head Office: CIDCO Bhavan, CBD Belapur, Navi Mumbai 400 614. Tel.: 91-22-6791 8241; Fax: 91-22-6791 8294;
For updated information, follow us on - @cidco_ltd :/cidco YouTube CIDCO Ltd. @cidco_ltd

**दि. १९ जुलै २०२४**

# सिडकोच्या ३३२२ सदनिकांची महागृहनिर्माण योजना जानेवारी - २०२४ ची संगणकीय सोडत संपन्न

सिडको महामंडळाच्या महागृहनिर्माण योजना जानेवारी - २०२४ करीता संगणकीय सोडत १९ जुलै २०२४ रोजी सिडको भवन येथील सिडको सभागृहामध्ये यशस्वीरीत्या पार पडली. सिडकोतर्फे २६ जानेवारी २०२४ रोजी या महागृहनिर्माण योजनेचा प्रारंभ करण्यात येऊन नवी मुंबईतील तळोजा आणि द्रोणागिरी नोड येथे परवडणाऱ्या दरातील ३३२२ सदनिका विक्रीसाठी उपलब्ध करून देण्यात आल्या होत्या.

या प्रसंगी महागृहनिर्माण योजना जानेवारी - २०२४ मध्ये यशस्वी ठरलेल्या अर्जदारांचे श्री. विजय सिंघल, उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, सिडको यांनी अभिनंदन केले.

सदर संगणकीय सोडत प्रक्रियेवर देखरेख करण्याकरिता सिडकोतर्फे पर्यवेक्षक म्हणून श्री. मोईझ हुसेन आणि अर्जदारांपैकी ३ अर्जदार हे पंच म्हणून उपस्थित होते. सोडतीमध्ये घर लाभलेल्या अर्जदारांनी सिडकोमुळे नवी मुंबईसारख्या सोयी सुविधांनी परिपूर्ण शहरात आपल्या हक्काच्या घराचे स्वप्न पूर्ण झाल्याची भावना यावेळी व्यक्त केली.

सिडकोतर्फे वेगाने विकसित होत असलेल्या तळोजा आणि द्रोणागिरी नोडमध्ये ३३२२ सदनिका या प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक आणि सर्वसाधारण गटातील (General Category) नागरिकांकरिता उपलब्ध करून देण्यात आल्या होत्या. तळोजा या नोडला सिडकोच्या नवी मुंबई मेट्रोद्वारे उत्तम कनेक्टिव्हिटी लाभली आहे. द्रोणागिरी हा जेएनपीटी बंदरालगतचा नोड असल्याने या परिसरात मोठ्या प्रमाणावर वाणिज्यिक संधी निर्माण होत आहेत. द्रोणागिरी नोडला नेरूळ-उरण रेल्वेद्वारे कनेक्टिव्हिटी लाभली आहे. तसेच सिडकोच्या नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळापासून द्रोणागिरी नोड हा नजीकच्या अंतरावर आहे.

सिडकोतर्फे गृहनिर्माण योजनेच्या संगणकीय सोडतीसाठी वापरण्यात येणारी प्रणाली (सॉफ्टवेअर) ही पूर्णत: मानवी हस्तक्षेपविरहित आहे. तसेच भारतीय तंत्रज्ञान संस्था (आयआयटी) मुंबई येथील संगणक विभागाकडून या प्रणालीची तपासणी करण्यात आली आहे. या प्रणालीद्वारे काढण्यात येणाऱ्या सोडत प्रक्रियेमध्ये अर्जदारांमधील निवडक प्रतिनिधींना पंच म्हणून सहभागी करून घेतले जाते. तसेच सोडती दरम्यान पात्र अर्जदारांच्या आणि सदनिकांच्या यादीची याद्दच्छिक (Random) पद्धतीने सरमिसळ करण्यात येते. अत्यंत पारदर्शक व निष्पक्ष अशा या प्रक्रियेद्वारे सर्व अर्जदारांना समान संधी सुनिश्चित करण्यात येते.

महागृहनिर्माण योजना जानेवारी - २०२४ च्या सोडतीमध्ये यशस्वी ठरलेल्या अर्जदारांची यादी सिडकोच्या lottery.cidcoindia.com या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आली आहे. अयशस्वी अर्जदारांची अनामत रक्कम लवकरात लवकर परत केली जाईल.

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

**मा. संपादक महोदय,**

**वरील बातमीस आपल्या लोकप्रिय वर्तमानपत्रातून ठळक प्रसिद्धि देऊन उपकृत करावे, ही विनंती.**

**जनसंपर्क विभाग, सिडको**